**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**

क्रमांक - रानिआ/मनपा/२०१२/प्र.क्र. ११/का.५,
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक- २८/०१/२०१२

प्रति,
आयुक्त,
महानगरपालिका (सर्व)

विषय :- महानगरपालिकेच्या सदस्य पदाची निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने भरावयाच्या अनामत रकमेबाबत..

महोदय,

महानगरपालिकेच्या सदस्य पदाची निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने जमा करावयाच्या अनामत रकमेसंदर्भात **मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम २६अ मधील पोटकलम (१) मध्ये पुढीलप्रमाणे तरतूद आहे :-**

" (१) प्रभाग निवडणुकीसाठी उमेदवाराच्या नामनिर्देशनाकरिता नेमलेल्या तारखेस किंवा तारखेपूर्वी प्रत्येक उमेदवार निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे पाच हजार रुपये इतकी रक्कम रोखीने अनामत म्हणून ठेवील किंवा ठेवण्याची तजवीज करेल आणि अशाप्रकारे अनामत रक्कम ठेवण्यात आली नसेल तर, कोणताही उमेदवार रितसर नामनिर्देशित झालेला आहे असे मानण्यात येणार नाही.

परंतु, उमेदवार अनुसूचित जातीचा, अनुसूचित जमातीचा, नागरिकांच्या मागासवर्गाचा किंवा महिला असेल तर, ही अनामत रक्कम दोन हजार पाचशे रुपये इतकी असेल. "

**मुंबई प्रांतिक महानगरपालिका नियम, १९४९ च्या अनुसूची-घ मधील नियमांच्या नियम-१० च्या पोटकलम (१) मध्ये, नागपूर शहर पालिका निवडणूक नियमामधील नियम-८ (१) मध्ये पुढीलप्रमाणे तरतुदी आहेत :-**

" (१) एखाद्या प्रभाग निवडणुकीसाठी नियत केलेल्या दिनांकाला किंवा त्यापूर्वी प्रत्येक उमेदवाराने रुपये पाच हजार एवढी रोख रक्कम निवडणूक अधिकाऱ्याकडे ठेव म्हणून जमा केली पाहिजे किंवा करण्याची व्यवस्था केली पाहिजे, उमेदवाराने अशी ठेव न भरल्यास तो योग्यरितीने नामनिर्देशित झाला असल्याचे मानण्यात येणार नाही.

परंतु, जेव्हा उमेदवार, अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमाती किंवा नागरिकांचा मागासवर्ग किंवा महिला यामधील असेल आणि अशा उमेदवाराने त्याचे महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० च्या तरतुदींना अनुसरुन, सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र व पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर केलेले असेल तर अशा बाबतीत, उमेदवाराने अशाप्रकारे ठेवावयाची अनामत रक्कम दोन हजार पाचशे इतकी असेल; ”

अनामत रकमेबाबत संबंधित अधिनियमामध्ये वरीलप्रमाणे तरतूद असली तरी देखील राज्य निवडणूक आयोगाकडून निवडणूक निर्णय अधिकारी यांच्यासाठी जानेवारी, २०१२ मध्ये तयार करण्यात आलेल्या सर्वसाधारण सूचना व माहिती पुस्तिका यामधील प्रकरण २ (नामनिर्देशनपत्राबाबतच्या तरतुदी-सर्वसाधारण सूचना) मधील **परिच्छेद ११ मध्ये अनावधानाने** अराखीव पद व राखीव असलेल्या पदांवरुन निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने भरावयाची अनामत रक्कम असा चुकीचा उल्लेख झालेला आहे. तरी उक्त परिच्छेद ११ ऐवजी पुढीलप्रमाणे परिच्छेद दाखल करण्यात आला आहे असे वाचण्यात यावे :-

**परिच्छेद ११ -** महानगरपालिकांच्या निवडणुकीकरिता उमेदवाराने रुपये पाच हजार इतकी रक्कम निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे रोखीने अनामत म्हणून ठेवणे आवश्यक आहे. परंतु उमेदवार अनुसूचित जातीचा, अनुसूचित जमातीचा, नागरिकांच्या मागासवर्गाचा किंवा महिला असेल तर ही रक्कम रुपये दोन हजार पाचशे इतकी असेल.

वरीलप्रमाणे माहिती पुस्तिकेत करण्यात आलेल्या दुरुस्तीबाबत सर्व निवडणूक निर्णय अधिकारी यांना तात्काळ कळविण्यात यावे.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

( नि. ज. वागळे )
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

D:\Letter for Code of Conduct. Punedoc.doc/D.O.7